संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# स्वतंत्र पंतप्रधान मागणारा दिवाना अब्दुल्ला

**काश्मीरमधला** दहशतवाद कोणामुळे इतके दिवस पोसला गेला हे स्वतंत्रपणे सांगण्याची गरज नाही. परंतु तिथले राजकारणी आणि फुटीरतावाद्यांनी संगनमताने दहशतवाद जोपासला ही वस्तुस्थिती आहे. पुलवामा हल्ल्यानंतर काश्मीरमधल्या फुटीरतावाद्यांच्या नाड्या आवळल्या गेल्या. जम्मू-काश्मीर लिबरेशन फंड आणि जमात-ए-इस्लामी या दोन्ही संघटनांवर केंद्र सरकारने बंदी घालून सत्तेची मनमौजी मजा घेणाऱ्यांची चांगलीच नाकेबंदी केली आहे. काश्मिरमध्ये चालणारे विघटनवादी कारस्थान मुळासकट उखडण्याचे स्वातंत्र्य लष्कराला दिल्यानंतर तिथे पिढीजात राजकारण करणाऱ्यांचेही आता धाबे दणाणलेले दिसते. कदाचित याच वैफल्यग्रस्त मानसिकतेमुळेच नॅशनल कॉन्फरन्सचे नेते आणि काश्मिरचे माजी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी बेफाम विधाने करायला सुरुवात केलेली पाहायला मिळते. काश्मिरची स्वायत्तता टिकवण्याकरीता काश्मिरला स्वतंत्र राष्ट्रपती आणि स्वतंत्र पंतप्रधानच असला पाहिजे. म्हणजेच भारताचा अविभाज्य अंग असलेल्या काश्मीरसाठी ओमर अब्दुल्लांना वेगळा राष्ट्रपती आणि पंतप्रधान हवा आहे. कधी काळी काश्मीर संस्थान भारतात विलीन करताना त्यावेळची परिस्थिती लक्षात घेऊन स्वतंत्र पंतप्रधान शिवाय काश्मिरसाठी स्वतंत्र घटना आणि वेगळा ध्वजही मान्य केला गेला होता. परंतु नंतरच्या काळात काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असल्याने एकाच देशाला दोन पंतप्रधान आणि दोन निशाण ठेवता येणार नाहीत. असा निर्णय घेतला गेला. गेली तीस चाळीस वर्षे काश्मीरमध्ये राजकीय व्यवस्था निर्माण करताना मुख्यमंत्रीपदच कायम राहिले आहे. परंतु या पदाचाही प्रामुख्याने या अब्दुल्ला घराण्याकडून इतका गैरवापर केला की आपण काश्मिरचे अनभिषिक्त सम्राट आहोत आणि आजन्म तिथली सत्ता आपल्याकडेच राहिली पाहिजे. यासाठी त्यांनी प्रयत्न चालवले. पाकिस्तानच्या हातातील बाहुले बनून सतत काश्मीरला अस्थिर ठेवण्याचे काम तिथल्या राजकारण्यांनी केले. स्वाभाविकपणे काश्मीरमध्ये त्यांनी कधीच शांतता निर्माण होऊ दिली नाही. आणि आता जेव्हा या सगळ्या फुटीरतावादी आणि विघटनवाद्यांची पाळेमुळे खणायला सुरुवात झाली तेव्हा त्याची झळ आपल्यालाही पोहचेल अशी भीती अब्दुल्ला घराण्याला वाटलेली दिसते. म्हणूनच त्या नैराश्यातून ओमर यांनी काश्मिरसाठी स्वतंत्र पंतप्रधान असण्याची स्वप्ने पाहिलेली दिसतात.

**वैफल्यग्रस्तेतून मागणी**

मुळातच हे अब्दुल्ला घराणे पहिल्यापासूनच सत्तेचे दिवाने आहे. पण ही सत्ता उपभोगत असताना आपण देशाचे किंवा काश्मिरी समाजाचे काही देणे लागतो. याचे भान त्यांनी ठेवले नाही. जनतेची सुरक्षितता पाहण्यापेक्षाही त्यांनी फुटीरतावाद्यांची आणि पर्यायाने दहशतवाद्यांची सुरक्षितता महत्वाची मानली. अतिशय नियोजनपूर्वक १९९०च्या सुमारास तिथल्या काश्मिरी पंडितांना हाकलून लावण्याचा डाव साधला. काश्मिरी पंडितांनी हा प्रदेश सोडून जावे अन्यथा परिणामांना सामोरे जावे लागेल. असे इशारेही दिले गेले होते. तब्बल पाच लाख काश्मिरी पंडित आपले पिढीजात घरदार , शेतजमीन सोडून आपला जीव वाचवण्यासाठी तिथून बाहेर पडले. त्यांना थोपवण्याकरीता तिथल्या एकाही राजकारण्याने पुढाकार घेतला नाही म्हणजेच अब्दुल्ला घराण्याने अनेक वर्षे सत्ता गाजवूनही काश्मिरी पंडितांचे विस्थापन रोखले नाही. किंवा त्यांचे पुनर्वसन व्हावे असाही प्रयत्न केला नाही. याउलट गेल्या चाळीस वर्षात जम्मू-काश्मीर लिबरेशन फ्रंट, जमात-ए-इस्लामी, शरियत कॉन्फरन्स यासारख्या फुटीरतावाद्यांना उघडपणे पाठिंबा दिला. केवळ पाठिंबाच दिला असे नव्हे तर त्यांना सर्व प्रकारची मदत दिली. त्या फुटीरतावाद्यांना सरकारी खर्चाने सुरक्षितता देण्यापासून ते सरकारी जमीनी देण्यापर्यंत सगळे उद्योग केले गेले. ज्या फुटीरतावाद्यांच्या जोरावर अब्दुल्ला घराण्याने सत्ता गाजवणे चालू ठेवले होते. त्यालाच आता तडाखा बसत असल्याने ते भयभीत झालेले दिसतात. आणि पुन्हा स्वतंत्र पंतप्रधान आणि राष्ट्रपतींच्या मागणीची कबर खणायला त्यांनी सुरु केलेले दिसते. या मागणीला भारताने यापूर्वीच दफन केलेले आहे. ही मागणी कधीही वर येणार नाही अशीच आता व्यवस्था झाल्याने ओमर यांची अस्वस्थता आणखीनच वाढलेली दिसते. त्यांची ही मागणी म्हणजेच फुटीरतावादी किंवा विघटनवादी मानसिकतेची विखारी वळवळ ठरते. त्यांच्या या विधानाचा देशातील सर्व राजकीय पक्षांनी निषेध केला पाहिजे. नेमक्या निवडणुकीच्या धामधुमीतच त्यांनी हे विधान करून पुलवामा हल्ल्यानंतर निर्माण झालेल्या संतप्त आगीमध्ये तेल ओतण्याचे काम केले आहे.

**परिस्थिती बदलली आहे**

निवडणुकीनंतर त्यांच्या या विधानाचा कायदेशीर पध्दतीने समाचार घेतला गेला पाहिजे. आपण भारतात राहातो पाकिस्तानात नाही. याचे त्यांनी आता भान ठेवावे. आपण आतापर्यंत उपभोगलेली सत्ता यापुढे तशीच उपभोगायला मिळणार नाही. विशेषतः काश्मीरसंदर्भात पाकिस्तानने ज्या प्रकारे भारताला त्रास दिलेला आहे. आणि स्थानिक राजकारण्यांनी पाकिस्तानला सक्रीय होण्याची जी संधी दिली आहे. त्यातून खूप मोठे नुकसान देशाला सहन करावे लागेल. आता मात्र परिस्थिती बदलली आहे. तेव्हा सत्तेचे दिवाने असणाऱ्या अब्दुल्ला घराण्याने अशी स्वप्न पाहाणे सोडून दिले पाहिजे. काश्मीर हे भारताचे अविभाज्य अंग आहे तिथे पूर्णपणे भारत सरकारचीच ध्येय धोरणे राबवली जातील एवढेच नव्हे तर भविष्यकाळात काश्मीरला दिला गेलेला विशेष दर्जाही काढावा लागेल. काश्मीरच्या या विशेष दर्जातून स्वतःचा दर्जा टिकवून ठेवण्याची या लोकांची खटपट,लटपट आता बंद व्हायला हवी. परिणामी बदललेल्या परिस्थितीचे भान ओमर अब्दुल्ला यांनी ठेवावे. कोणत्याही परिस्थितीत काश्मिरची स्वायत्तता जाऊ देणार नाही अशा प्रकारची त्यांनी केलेली वल्गना म्हणजे त्यांच्या सत्तेला ओहोटी लागल्याचीच कबुली म्हणायला हवी. काळ बदललेला आहे. भारताने आपला देश किंवा काश्मीरसारखा प्रदेश अधिक सुरक्षित करण्याच्या दिशेने काही पावले उचलली आहेत. ज्याला आता आंतरराष्ट्रीय समुदायसुध्दा पाठिंबा देताना दिसून येतो.